पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ४

**सभावृत्तांत**

दिनांक – **२२/०६/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२२/०६/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.संजय बबन नेवाळे - सभापती
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.अपर्णा निलेश डोके
४. मा.संजय मल्हारराव वाबळे
५. मा.अश्विनी विक्रम वाघमारे

या शिवाय मा.शेख – उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.२) तानाजी गावडे व्यायामशाळा ११ महिने भाडेतत्वावर मिळणेबाबत – मा.अपर्णा डोके, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) मोकळी जागा वापरणेस परवानगी मिळणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल मधील बॅडमिंटन हॉल ११ महिने भाडे कराराने चालविण्यास देणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.५ गंगोत्री पार्क भोसरी दिघी रोड मधील बॅडमिंटन हॉल चालविणेस देणेबाबत – मा.संजय वाबळे, मा.अपर्णा डोके यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे                अनुमोदक – मा.संजय वाबळे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक २२/०६/२०१८ ( दुपारी ३.०० वा.) ची पाक्षिक सभा सोमवार दिनांक २५/०६/२०१८ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** - सोमवार दिनांक २५/०६/२०१८ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ४

**सभावृत्तांत**

**(** दिनांक २२/०६/२०१८ ( दुपारी ३.०० वा.) ची तहकूब सभा **)**

दिनांक – **२५/०६/२०१८** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक २२/०६/२०१८ ( दुपारी ३.०० वा.) ची तहकूब सभा सोमवार दिनांक **२५/०६/२०१८** रोजी दुपारी **२.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.संजय बबन नेवाळे - सभापती
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.अपर्णा निलेश डोके
५. मा.संजय मल्हारराव वाबळे
६. मा.अश्विनी विक्रम वाघमारे
७. मा.कुंदन अंबादास गायकवाड

या शिवाय मा.चितळे – सहाय्यक आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक – ०१
दिनांक – २५/०६/२०१८ विभाग – क्रीडा
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अपर्णा डोके
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/४३५/२०१८, दि.०५/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२, दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे, क्रीडा धोरणतील अट क्र.२३ मध्ये खेळाडू दत्तक योजने अंतर्गत निवड झालेल्या खेळाडूने सलग २ वर्षात राज्य, राष्ट्रीय व आंतरविद्यापीठ स्तरावर प्राविण्य न मिळविल्यास अशा खेळाडूंना तेथून पुढे या योजनेचा लाभ दिला जाणार नाही असे नमुद आहे. त्यानुसार खेळाडू दत्तक योजना २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ चे लाभार्थी ४५ खेळाडूंच्या प्राविण्याबाबत संबंधीत क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा अधिकारी यांनी तपासणी केली असता १४ खेळाडू पात्र व १७ अपात्र असा अहवाल क्रीडा विभागाला दिलेला आहे. प्रस्तावात नमुद प्रमाणे १४ पात्र खेळाडूंना खेळाडू दत्तक योजना २०१८–१९ चा लाभ १ वर्षाकरीता देणेस व त्याकामी येणा-या खर्चास र.रू.२४,८४,८००/- (अक्षरी र.रु.चोविस लाख, चौ-याऐंशी हजार, आठशे फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर

खर्चीटाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक – ०२

दिनांक – २५/०६/२०१८

सुचक – मा.अपर्णा डोके अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अपर्णा डोके, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१८ चिंचवड येथील कै.तानाजी गावडे व्यायामशाळा अजित स्वयंरोजगार संस्था मनपाकडून कोणतेही शुल्क न घेता चालविण्यास तयार असल्याने यापूर्वीचे सर्व ठराव विखंडीत करुन सदरची व्यायामशाळा अजित स्वयंरोजगार संस्था यांना चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक – ०३

दिनांक – २५/०६/२०१८

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संजय वाबळे

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.१४ येथे मोहननगर परिसरामध्ये क्रीडा विभागाच्या वतीने स्विमिंग टँक व लॉन टेनिसची मैदाने उभारण्यात आली आहे. त्याच्या लगत रिकामी जागा आहे ती वापरात नाही. प्रभागातील ब-याच खेळाडूंकडून मल्लखांब व दोरखंड खेळण्यासाठी जागेची मागणी होत आहे. तरी सदरची मोकळी जागा मल्लखांब व दोरखंडासाठी उपलब्ध करुन देणेस तसेच या खेळासाठी लागणारे साहित्य उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १५ विषय क्रमांक – ०४

दिनांक – २५/०६/२०१८

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संजय वाबळे

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.८ इंद्रायणीनगर येथील संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल मधील बॅडमिंटन हॉल अर्थव स्वयंरोजगार औद्योगिक सेवा सहकारी संस्था पुणे ३९ यांना ११ महिन्याच्या करारनाम्याने प्रतिमहा एका कोर्टचे भाडे र.रु.९,९००/- आकारुन या दरात १०% भाडेवाढ करुन १ महिन्याचे भाडे र.रु.१०,८९०/- इतके येत आहे. त्यामध्ये जीएसटी १८% प्रमाणे र.रु.१,९६०/- असे एक कोर्ट प्रतिमहा भाडे एकूण र.रु.१२,८५०/- आकारुन ४ कोर्ट प्रतिमहा भाडे र.रु.१२८५०/- x ४ कोर्ट= र.रु.५१,४००/- असे भाडे आकारुन व अनामत र.रु.१,००,०००/- घेऊन अर्थव स्वयंरोजगार औद्योगिक सेवा सहकारी संस्था पुणे ३९ यांना ११ महिने भाडे आकारुन कराराने चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी

समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६ विषय क्रमांक – ०५

दिनांक – २५/०६/२०१८

सुचक – मा.संजय वाबळे अनुमोदक – मा.अपर्णा डोके

संदर्भ – मा.संजय वाबळे मा.अपर्णा डोके यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.५ गंगोत्री पार्क भोसरी दिघी रोड येथे बॅडमिंटन कोर्ट आहे. ते एम.डी.स्पोर्ट यांना प्रतीमहा र.रु.९,९००/- यामध्ये १०% भाडेवाढ र.रु.९९०/- असे एकूण र.रु.१०,८९०/- यावरती १८% जीएसटी र.रु.१,९६०/- असे एकूण एका कोर्टचे प्रतिमहा भाडे एकूण र.रु.१२,८५०/- याप्रमाणे ११ महिन्याच्या भाडे करारानुसार चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३८४/२०१८
दिनांक : २८/०६/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.